दै. देशोन्नती दि. 17.02.2020



# वाहन चोर वाहनासह आठ तासात मांडवी पोलिसांच्या ताब्यात



**मांडवी** ▪ वार्ताहर

शहरात पार्किंग केलेली बोलेरो मॅक्स रात्री चोरीला गेली ती आठच तासात विदर्भातील नस्करी पार्डीला दोन चोरासह सापडली. या चोरांनी त्याच रात्री स्वीप्ट डिजायर चोरून नेण्याचाही प्रयत्न केला, पण तो फसला या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे.

१५ फेब्रुवारी रात्री रोहन मादावार यांच्या मालकीची पार्क केलेली बोलेरो मॅक्स एम एच २६ ए डी ३४२९ (किंमत सहा लाख) चोरांनी बालाजी कृषी सेवा केंद्रा समोरून पळवली व शरद कोटावार यांच्या मालकीच्या स्वीप्ट डिजायर एम एच २६ए के ६६६७ च्या काचा फोडून पळविण्याचा प्रयत्न केला पण तो फसला.

सकाळी वाहन चोरीस गेल्याचे पाहून रोहन मादावार यांनी मांडवी पोलिसात तक्रार दिल्यावरून सपोनि संतोष केंद्रे यांनी आजूबाजूच्या पोलीस ठाण्यांना याची माहिती दिली.

तेव्हा सकाळी त्यांना एक फोन आला की नस्करी पार्डी येथे या क्रमाच्या वाहनाने जनावरांच्या गोठ्यास धडक दिली म्हणून कळताच सपोनि संतोष केंद्रे यांनी एएसआय विजय कोळी, चालक र. डांगे तक्रारदार रोहन मादावार व पोलीस मित्र सुनील नत्थु चव्हाण व त्याचे सहकारी सोबत घेऊन पार्डी ला गेले असता आरोपी पवन हरिभाऊ निकोडे (२२) व शेतात पळून जाणाऱ्या गजानन पुंडलिक सोनूले (२७) दोघे रा. पाटोदा (बु.) यांना ताब्यात घेतले. ही सर्व कारवाई आठ तासात घडली. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण पसरले होते. पोलीस व पोलीस मित्राचे कौतुक होत आहे.

देशोन्नती. 17.02.2020.